करोना/२०२०/सुचना/आदेश त. २/

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड -अलिबाग
आपत्ती व्यवस्थापन विभाग, सामान्य शाखा
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, जि.रायगड
दुरध्वनी क्र. :- ०२१४१-२२२०९७/२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र.:- ०२१४१-२२७४५१/२२२०२५
ईमेल: collector_raigad@maharashtra.gov.in / rdcraigad@gmail.com

क्र.सांशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.१४/०३/२०२०

**प्रथम प्राधान्याने**

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग
पोलीस आयुक्त, नवी मुंबई
जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड
आयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल
जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड
जिल्हा आरोग्य अधिकारी, रा.जि.प.अलिबाग
उपजिल्हाधिकारी (सा.प्र.), जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड
उपविभागीय अधिकारी (सर्व)
तहसिलदार (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व)
कार्यालय/शाखा/विभाग प्रमुख (सर्व)

**विषय:- करोना विषाणू संक्रमण प्रतिबंधात्मक उपाययोजनां करणेबाबत कार्यालयीन उपस्थितीची नोंद घेण्यासाठी वापरण्यात येणारी बायोमेट्रीक प्रणाली पुढील आदेश होईपर्यंत बंद ठेवणेबाबत**

जागतिक आरोग्य संघटनेने करोना विषाणू संक्रमण हा **'जागतिक साथीचा रोग (World Pandemic)'** घोषित केला आहे. त्यानुषंगाने चीन, इटली, दक्षिण कोरिया, स्पेन, इराण, फ्रान्स, दुबई या करोना विषाणू बाधित देशातून दिनांक १३/०३/२०२० पासून येणाऱ्या प्रवाशांना Quarantine Cell मध्ये त्यांचा Incubation Period संपेपर्यंत निगराणीखाली ठेवण्यात यावे, अशा सचूनां शासनाने दिलेल्या आहेत. तसेच करोना विषाणू संक्रमण रोखण्यासाठी जिल्हयात कोणत्याही प्रकारचे केंद्र व राज्य शासनाचे कार्यक्रम, प्रशिक्षण, कार्यशाळा, मेळावे, शासकीय व खाजगी उत्सव, सार्वजनिक कार्यक्रम, मोर्चा, धरणे अंदोलन, परदेशी व देशांतर्गत पर्यटनाचे व इतर गर्दीच्या कार्यक्रमांना परवानगी देण्यात येवू नये, अशा सूचनां दिलेल्या आहेत.

त्यानुषंगाने आपल्याला सूचित करण्यात येते की, करोना विषाणूचे संक्रमण रोखण्यासाठी अधिकारी/कर्मचारी यांचे कार्यालयीन उपस्थितीची नोंद घेण्यासाठी वापरण्यात येणारी बायोमेट्रीक प्रणाली पुढील आदेश होईपर्यंत बंद ठेवण्यात यावी. याकाळात उपस्थितीची नोंद घेण्यासाठी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची नोंदवहीमध्ये (रजिस्टर) स्वाक्षरी घ्यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी रायगड

प्रत माहितीस्तव
१. मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई
२. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय,मुंबई